अर्धशासकीय पत्र क्र.मुमाआ/माअनि/४(१)/२०१६

रत्नाकर गायकवाड
मुख्य माहिती आयुक्त

राज्य माहिती आयोग
महाराष्ट्र

मुख्य सचिवांचे कार्यालय
मुंबई-३२
दि. 8/3/16
15192 88

04 MAR 2016

विषय: माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत नागरिकांकडून विशिष्ट विषयांबाबत वारंवार करण्यात येणारे अर्ज.........

प्रिय श्री.

दिनांक २६.११.२०१६ रोजी सहयाद्री येथे विभागीय मुख्यालयांच्या स्तरावर आरटीआय ऑनलाईन ॲप्लीकेशनच्या (RTI Online Applications) सदर कार्यक्रमाच्या उदघाटनाच्या दरम्यान मा.मुख्यमंत्री यांनी एक महत्वाची सूचना केली. ज्या विषयांबाबत नागरिकांकडून वारंवार माहिती अर्ज करण्यात येतात,अशा विषयांची माहिती शासनाला मिळाल्यास त्या विषयाबाबतची माहिती अद्ययावत ठेवून ती प्रत्येक विभागाने त्यांच्या संकेतस्थळावर ठेवल्यास व आवश्यकतेनुसार अशा विषयांबाबत पध्दतीत सुधार (Systems Improvement) केल्यास नागरिकांची मोठी सोय होऊ शकते व माहिती अधिकार अधिनियमांतर्गत येणा-या अर्जाची संख्या देखील मोठया प्रमाणात कमी होऊ शकते अशी सुचना मा.मुख्यमंत्री यांनी केली.

माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम-४ अंतर्गत प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने अभिलेख योग्यरितीने सुचिबध्द करुन त्याची निर्देशसुची तयार करावी व ज्यांचे संगणकीकरण करणे आवश्यक आहे. अशा अपेक्षित अभिलेखांचे संगणकीकरण करणे तसेच प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने आपल्या प्राधिकरणाबाबतचा तपशिल ,कर्तव्ये ,निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अनुसरण्यात येणारी कार्यपध्दती ,आपल्या नियंत्रणाखाली येणारे दस्तऐवज प्रवर्गाचे विवरण ,सर्व योजनांचे तपशिल ,अर्थसहाय्य ,कार्यक्रमांची अंमलबजावणीची रित तसेच वाटप केलेल्या रक्कमा व अशा कार्यक्रमांच्या लाभाधिकारांचे तपशिल, ज्या व्यक्तींना सवलती परवाने किंवा प्राधिकारपत्रे दिलेली आहेत इत्यादि माहिती स्वत:हून प्रसिध्द करुन दरवर्षी ती अद्यायावत करावे, अशा प्रकारची स्पष्ट तरतूद असताना देखील

Imp
Pl give instns all concerned we will review in next C.C.
Secretary CS.
7/3/16

मुख्य सचिव
महाराष्ट्र शासन
अ.मु.स./र.व का

१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२.
दूरध्वनी क्रमांक : ०२२-२२८५ ६० ७८ फॅक्स : ०२२-२२०४ ९३ ९०
e-mail : ratnakar_gaikwad@hotmail.com
website : www.sic.maharashtra.gov.in

बहुवंशी सार्वजनिक प्राधिकरणाकडून या महत्वाच्या तरतूदीची अंमलबजावणी होत नसल्याने नागरिकांकडून येणा-या माहिती अर्जाची संख्या मोठया प्रमाणात आहे यात शंका नाही.

याबाबत आयोगाने वेळोवळी आपल्याला तसेच सार्वजनिक प्राधिकरणांना माहिती अधिकार अधिकार अधिनियम कलम-१९ (८) (क) प्रमाणे निर्देश दिलेले आहेत. तथापि यात अजुनही सुधारणा झाल्याचे दिसत नाही.

मा.मुख्यमंत्री महोदयांनी केलेल्या सुचनेच्या अनुषंगाने दिनांक २०.१.२०१६ रोजी मी सर्व राज्य माहिती आयुक्तांकडून कोण-कोणत्या विभागाकडून व विषयाबाबत नागरिकांकडून माहिती मागितली जाते याबाबत त्यांचे अभिप्राय देण्याबाबत विनंती केली होती.

त्यानुसार राज्य माहिती आयुक्त,पुणे खंडपीठाने प्रामुख्याने खालील विभागाबाबतची विशिष्ट माहितीची विचारणा केली जाते :

**१. महसूल विभाग**
**२. नगर विकास विभाग**
**३. गृह विभाग**
**४.ग्राम विकास विभाग**
**५.सार्वजनिक बांधकाम विभाग/जलसंपदा विभाग**
**६. शिक्षण विभाग**
**७.कृषि विभाग**
**८. सहकार विभाग**
**९. महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी**
**१०.आरोग्य विभाग**

**१) महसूल विभाग –**

अ) तलाठी दप्तरातील जुने फेरफार, ७/१२ उतारे इ. जुन्या अभिलेखाची मागणी केली जाते. जुने अभिलेख सर्वसाधारणपणे तहसील

अभिलेखागारात जमा केलेले असतात. तथापि संबंधित प्रकरणे आढळ होत नाही असेच प्रामुख्याने उत्तर दिले जाते.

**ब**) भूमि अभिलेख विभाग – पूर्वी झालेल्या जमीन मोजणी नकाशांचे उतारे, फाळणीबारा, स्कीम बुक, तसेच स्केलवर असणारे नकाशे (उदा. १/५०००) अशा नकाशांबाबत मिटरमध्ये लांबी, रुंदी इ. मागितली जाते. बऱ्याचदा जुने रेकॉर्ड आंढळ होत नाही असे उत्तर दिले जाते.

**क**) नोंदणी महानिरिक्षक – जुन्या दस्तांच्या नोदणीच्या प्रमाणित प्रती, त्यातील कागदपत्रे इ. माहिती मागितली जाते. जुने दस्त आढळ होत नसल्याचे उत्तर देण्यात येते.

**ड**) पुरवठा विभाग – इतर व्यक्तींच्या रेशन कार्डची माहिती, अन्नधान्य वितरणाबाबत तसेच विशिष्ट स्वस्त धान्य दुकानदारांकडील कागदपत्रांची मागणी केली जाते.

२) **नगरविकास विभाग** – महानगरपालिका व नगर परिषदा मधील अनधिकृत बांधकामे/अतिक्रमणे बाबतच्या तक्रारी व त्या तक्रारींवर केलेल्या कारवाई बाबतची माहिती तसेच दिलेले बांधकाम परवाने (Building permission), भोगवटा प्रमाणपत्र तसेच नगर पालिका, महानगरपालिका विकास कामांसंदर्भातील निविदा प्रक्रियेबाबतची कागदपत्रे इ. माहिती/कागदपत्रांची मागणी प्रामुख्याने केली जाते. विशेषत: मुंबई

महापालिकेत इमारतींचे मंजूर आराखडे (sanctioned building plan) मोठया प्रमाणात गहाळ झाले असून नागरिकांचे माहिती अर्ज मोठया प्रमाणात येत आहेत. या गहाळ अभिलेखांची पुर्नबांधणी करणे आवश्यक आहे .

३) **गृह विभाग** – पोलिस अधिकाऱ्यांकडे सर्वसामान्य नागरिकांनी दाखल केलेल्या तक्रारीवरील कार्यावाहीबाबतची माहिती मागितली जाते. तसेच काही प्रकरणातील तपासाच्या सद्यस्थितीबाबतची माहिती व त्यातील कागदपत्रांबाबतच्या प्रतींची मागणी केली जाते.

४) **ग्रामविकास विभाग** – ग्रामपंचायती व जिल्हा परिषदामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध विकास कामांची माहिती, त्यामधील कागदपत्रांची माहिती मागितली जाते. तसेच ग्रामपंचायतीचे ग्रामसेभेचे/मासिक सभांचे ठराव, इतिवृत्त इ. च्या प्रती मागितल्या जातात. जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या विकास कामांबाबत केलेल्या तक्रारींवरील कार्यवाहीची माहिती मागितली जाते. ग्रामपंचायतीच्या करआकारणी रजिस्टरमध्ये एखाद्या मिळकतीवर संबंधित व्यक्तीचे नाव, कशाच्या आधारे दाखल केले इ. माहिती मागितली जाते.

५) **सार्वजनिक बांधकाम/जलसंपदा विभाग** – या दोन्ही विभागांमार्फत करण्यात आलेल्या विविध कामांशी संबंधित अंदाजपत्रके/कामाच्या मोजमाप पुस्तीकांची (एम.बी.) प्रत इ. मागणी केली जाते. तसेच देण्यात आलेल्या

तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी, निविदा, वर्क ऑर्डर, झालेला खर्च इ. ची माहिती मागितली जाते. कामाच्या दर्जाबाबत आलेल्या तक्रारींवरील कार्यवाहीची माहिती मागणी केली जाते. तसचे देण्यात आलेल्या तांत्रिक मंजूरी, निविदा, वर्क ऑर्डर, झालेला खर्च इ. ची माहिती मागितली जाते.

कामाच्या दर्जाबाबत आलेल्या तक्रारींवरील कार्यवाहीची माहितीची मागणी केली जाते.

**६) शिक्षण विभाग –**

**अ)** या विभागाकडे प्रामुख्याने शाळा/महाविद्यालयांचे संच मान्यता, शिक्षक मान्यता प्रस्ताव व त्यासंबंधीच्या कागदपत्रांची मागणी केली जाते. त्याचप्रमाणे शिक्षण संस्थेकडे बिंदू नामावलीबाबत माहिती मागविली जाते.

**ब) विद्यापीठे** – विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांच्या प्रती, विविध महाविद्यालयासंदर्भातील चौकशी अहवाल इ. बाबतची माहिती मागितली जाते.

**७) कृषि विभाग** – तालुका कृषि अधिकारी, मंडळ कृषि अधिकारी यांनी केलेली विविध कामे व राबविलेल्या योजना, त्यासाठी प्राप्त निधी व खर्च, लाभार्थ्यांची नावे, अनुदानाचे वाटप इ. तसेच कामासंदर्भात केलेल्या तक्रारींवरील कार्यवाहीची माहिती प्रामुख्याने विचारली जाते.

**८) सहकार विभाग** – सहकारी संस्था ज्यांना भरीव स्वरुपाचे शासकिय अनुदान नाही, त्या 'सार्वजनिक प्राधिकरण' नसल्यातरी सहाय्यक निबंधक/उपनिबंधक यांचेकडे त्याबाबतची माहिती मागण्यात येते. त्यांनी आपल्या कार्यालयात जी माहिती उपलब्ध असेल ती मुदतीत पुरविणे अपेक्षित असते. तथापि सरसकटपणे अर्ज संस्थेकडे वर्ग करण्याचा त्यांचा कल दिसून येतो.

**९) महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी** - एखाद्या व्यक्तीच्या घरगुती विज कनेक्शन, शेती विज कनेक्शन, औद्योगिक/वाणिज्य कनेक्शन इ. साठी दिलेल्या कागदपत्रांची मागणी केली जाते. बऱ्याचदा हे जुने रेकॉर्ड असते. अनधिकृत विज जोडणी/विज चोरी इ. बाबतच्या तक्रारींवरील कार्यवाहीची माहिती मागितली जाते.

**१०) आरोग्य विभाग** – प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, जिल्हा रुग्णालय येथील औषधे/ यंत्रसामुग्रीच्या खरेदीबाबतची कागदपत्रे, कार्यरत अधिकारी/कर्मचारी इ. बाबतची माहिती, आरोग्य विभागाच्या विविध योजनांबाबतची माहिती मागितली जाते.

वर नमूद केलेली खाते व त्यांच्या खात्यासंबधी मागण्यात येणा-या विविध विषयाबाबतची माहिती पाहता, या विषयांबाबत माहिती जेवढे शक्य होईल तेवढी संकेतस्थळावर ठेवल्यास माहिती अधिकार अधिनियमांतर्गत येणा-या अर्जाची संख्या निश्चितपणे कमी होईल यात शंका नाही.

यास्तव आपल्या स्तरावर संबंधित खात्यांना याबाबत योग्यत्या सुचना दिल्यास मी आपला आभारी राहीन.

सस्नेह,

आपला स्नेहांकित

(रत्नाकर गायकवाड)

स्वाधीन क्षत्रिय
मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन